10 OCT 2026

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

ज्ञानेश्वर बंडगर महाराज : शिवाजी विद्यापीठात 'सामाजिक समता व राष्ट्रीय एकता'वर व्याख्यान

जातीभेद, स्त्री-पुरुष विषमतेने राष्ट्रीय एकात्मतेला अडथळे

प्रतिनिधी, कोल्हापूर

समाजातील जातीभेद व स्त्री-पुरुष विषमता दूर केल्याशिवाय राष्ट्रीय एकात्मता निर्माण होऊ शकत नाही. त्यामुळे या विषमतेचे उच्चाटन करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन ज्ञानेश्वर बंडगर महाराज यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या सामाजिक समावेशन अभ्यास केंद्राच्या वतीने आयोजित कै. कासुबाई यलबाजी ममता तुकाराम मंगल स्मृती व्याख्यानमालेत ते बोलत होते. 'सामाजिक समता व राष्ट्रीय एकता'या विषयावर त्यांनी मार्गदर्शन केले. विद्यापीठाच्या प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होत्या.

बंडगर महाराज म्हणाले, देशाच्या प्राचीन इतिहासात भगवान बुद्ध, भगवान महावीर आणि सिद्ध परंपरेने सामाजिक समतेच्या प्रस्थापनेसाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले. महात्मा फुले यांनी मांडलेला एकत्वाचा विचार आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जातिव्यवस्थेच्या निर्मूलनासाठी केलेले वैचारिक कार्य हे समताधिष्ठित समाजनिर्मितीसाठी मार्गदर्शक ठरणारे आहे. जातिव्यवस्थेचे समूळ उच्चाटन करण्यासाठी धार्मिक, सांस्कृतिक आणि राजकीय क्षेत्रांत परिवर्तन घडवून आणणे गरजेचे आहे; असेही त्यांनी स्पष्ट केले.

प्र-कुलगुरू डॉ. जाधव म्हणाल्या, यांनी सामाजिक समावेशन केंद्राच्या माध्यमातून विद्यापीठ समाजातील विविध घटकांना जोडून घेण्याबरोबरच त्यांना मुख्य प्रवाहात ओळख प्रदान करण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे सांगितले.

अभ्यास केंद्राचे संचालक डॉ. मुरलीधर भानारकर यांनी स्वागत केले. अविनाश भाले यांनी आभार मानले. यावेळी डॉ. चेतना सोनकांबळे, डॉ. किरण पवार, डॉ. विद्यानंद खंडागळे, डॉ. किशोर खिलारे, उदय पोवार, डॉ. युवराज कदम, डॉ. रामचंद्र पवार, राजेश मेश्राम, दिनेश उथळे, डॉ. अनमोल कोठडिया, यश आंबोळे, विश्वजीत गुरव, शरद पाटील, माऊली पांढरे आणि दत्ता घुटूकडे यांच्यासह विद्यापीठातील विविध अधिविभागांचे प्राध्यापक, संशोधक विद्यार्थी उपस्थित होते.



कोल्हापूर : व्याख्यानात बोलताना ज्ञानेश्वर बंडगर महाराज सोबत प्र-कुलगुरू डॉ. ज्योती, जाधव डॉ. मुरलीधर भानारकर, डॉ. चेतना सोनकांबळे.

बंधुभाव, समानतेची भावना निर्माण होणे गरजेचे

बंडगर महाराज म्हणाले, सामाजिक समतेतूनच राष्ट्रीय एकात्मतेचा पाया भक्कम होतो. महाराष्ट्रातील भक्ती व वारकरी परंपरेने सामाजिक समतेचा विचार सातत्याने मांडला आहे. राष्ट्रातील नागरिकांमध्ये परस्परांप्रती बंधूभाव, समानतेची भावना आणि एकत्व निर्माण झाल्याशिवाय राष्ट्रनिर्मितीची प्रक्रिया पूर्ण होऊ शकत नाही. छत्रपती शिवाजी महाराज, राजर्षी शाहू महाराज, महात्मा जोतिराव फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांमध्ये सामाजिक समता आणि राष्ट्रीय एकात्मतेचा मूलभूत आशय आहे.

जनसंपर्क कक्ष
10 OCT 2026 जनप्रवास शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

विद्यापीठातील 'नॅनोस्पार्क'मध्ये ७५ संशोधकांचा सहभाग



जनप्रवास : कोल्हापूर

विद्यार्थ्यांमधील संशोधनगुणांना प्रेरणा देण्यासाठी शिवाजी विद्यापीठातील स्कूल ऑफ नॅनोसायन्स अँड बायोटेक्नॉलॉजी अधिविभागातर्फे "आयडियाज टुडे, इनोव्हेशन्स टुमारो, इम्पॅक्ट फॉरेव्हर" या घोषवाक्यासह 'नॅनोस्पार्क २०२६' या विशेष संशोधनपर उपक्रमाचे आयोजन केले. 'आविष्कार' संशोधन स्पर्धेच्या पार्श्वभूमीवर "इग्नायटिंग यंग माइंड्स फॉर आविष्कार" या संकल्पनेवर आधारित या उपक्रमात ७५ संशोधक विद्यार्थ्यांनी वैज्ञानिक प्रकल्पांचे सादरीकरण केले. त्यामध्ये ५ वैज्ञानिक मॉडेल्स आणि २६ वैज्ञानिक पोस्टर्स यांचा समावेश होता.

या वैज्ञानिक सादरीकरणासाठी एकूण ६ विद्याशाखांमधील विषय दिले. यामध्ये मानव्यविद्या व ललितकला, वाणिज्य व विधी, केवल विज्ञान, कृषी, अभियांत्रिकी आणि वैद्यकीय शाखा या क्षेत्रांचा समावेश होता. यात पदवीस्तरीय, पदव्युत्तर आणि पीएच. डी. स्तरीय संशोधक विद्यार्थ्यांनी भाग घेतला. विद्यार्थ्यांच्या संशोधन सादरीकरणाचे राष्ट्रीय स्तरावरील शास्त्रज्ञांकडून मूल्यांकन व परीक्षण करण्यात आले. त्यासाठी पुण्याच्या सीएसआयआर- राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळा येथील प्रख्यात शास्त्रज्ञ डॉ. बाबुल प्रसाद, डॉ. जे. नित्यानंदन आणि डॉ. प्रकाश वाडगावकर उपस्थित होते. शिवाजी विद्यापीठाच्या जैवरसायनशास्त्र अधिविभागातील प्राध्यापक व विद्यापीठाचे 'आविष्कार' समन्वयक डॉ. पंकज पवार यांनीही परीक्षक म्हणून जबाबदारी पार पाडली. शेवटच्या सत्रात उत्कृष्ट सादरीकरण करणाऱ्यांना पुरस्कार व प्रमाणपत्र देऊन गौरविले. यामध्ये पदवीस्तरीय विभागातील ४ व पदव्युत्तर विभागातील ४ अशा एकूण ८ सादरीकरणांना पुरस्कार मिळाले. यामध्ये सहारा पटेल (बीएस्सी-३), तन्मयी पाटील, अंकित कुमार, तन्वी वडनाल, अंजली मायने (बीएस्सी-२), पूर्वा खरात, कावेरी पुजारी (बीएस्सी-१), समृद्धी गावडे, प्रज्वल पाटील, लंगम्बा थानओजम (एमएस्सी-१), प्रणव कांबळे (एमएस्सी-२) यांचा समावेश आहे. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी प्रा. किरणकुमार शर्मा यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले.

10 OCT 2026

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

'नॅनोस्पार्क'मध्ये ७५ विद्यार्थी संशोधकांचा सहभाग

प्रतिनिधी, कोल्हापूर



कोल्हापूर : प्रख्यात शास्त्रज्ञ डॉ. बाबुल कुमार, डॉ. जे नित्यानंदन व डॉ. प्रकाश वडगावकर यांच्यासमवेत 'नॅनोस्पार्क'' उपक्रमात सहभागी संशोधक विद्यार्थी.

शिवाजी विद्यापीठातील स्कूल ऑफ नॅनोसायन्स अँड बायोटेक्नॉलॉजी अधिविभागातर्फे 'आयडियाज टुडे, इनोव्हेशन्स टुमारो, इम्पॅक्ट फॉरेव्हर'' या घोषवाक्यासह 'नॅनोस्पार्क २०२६'' संशोधनपर उपक्रम झाला. यामध्ये ७५ संशोधक विद्यार्थ्यांनी आपल्या नाविन्यपूर्ण वैज्ञानिक प्रकल्पांचे सादरीकरण केले.

'आविष्कार' संशोधन स्पर्धेच्या पार्श्वभूमीवर 'इग्नायटिंग यंग माइंड्स फॉर आविष्कार'' या संकल्पनेवर आधारित त्यामध्ये ५ वैज्ञानिक मॉडेल्स आणि २६ वैज्ञानिक पोस्टर्स यांचा समावेश होता. या वैज्ञानिक सादरीकरणासाठी एकूण ६ विद्याशाखांमधील विषय देण्यात आले. यामध्ये मानव्यविद्या व ललितकला, वाणिज्य व विधी, केवल विज्ञान, कृषी, अभियांत्रिकी आणि वैद्यकीय शाखा या क्षेत्रांचा समावेश होता. यात पदवीस्तरीय, पदव्युत्तर आणि पीएच.डी. स्तरीय संशोधक विद्यार्थ्यांनी भाग घेतला.

विद्यार्थ्यांच्या संशोधन सादरीकरणाचे राष्ट्रीय स्तरावरील शास्त्रज्ञांकडून मुल्यांकन व परीक्षण करण्यात आले. त्यासाठी पुण्याच्या सीएसआयआर– राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळा येथील प्रख्यात शास्त्रज्ञ डॉ. बाबुल प्रसाद, डॉ. जे. नित्यानंदन आणि डॉ. प्रकाश वाडगावकर उपस्थित होते. शिवाजी विद्यापीठाच्या जैवरसायनशास्त्र अधिविभागातील प्राध्यापक व विद्यापीठाचे 'आविष्कार' समन्वयक डॉ. पंकज पवार यांनीही परीक्षक म्हणून जबाबदारी पार पाडली.

प्रकल्प सादरीकरणानंतर उपस्थित शास्त्रज्ञांनी विद्यार्थ्यांशी साधत संशोधनातील आधुनिक आव्हाने, पेटंट्स आणि भविष्यातील संधींबद्दल मार्गदर्शन केले. शेवटच्या सत्रात उत्कृष्ट सादरीकरण करणाऱ्यांना पुरस्कार व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. यामध्ये पदवीस्तरीय विभागातील ४ व पदव्युत्तर विभागातील ४ अशा एकूण ८ सादरीकरणांना पुरस्कार मिळाले.

यामध्ये सहारा पटेल (B.Sc. III), तन्मयी पाटील (B.Sc. II), अंकित कुमार, तन्वी वडनाल, अंजली मायने (eflelesner B.Sc.II), पूर्वा खरात, कावेरी पुजारी (B.Sc.I), समृद्धी गावडे (M.Sc.I), प्रज्वल पाटील (M.Sc.I), लंगम्बा थानओजम (M.Sc.I), प्रणव कांबळे (M.Sc. II) यांचा समावेश आहे. स्कूलचे संचालक प्रा. किरणकुमार शर्मा यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले.

जनसंपर्क कक्ष
10 OCT 2026 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

विकेंद्रित औद्योगीकरणाने राज्याची समावेशक प्रगती

■ ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. अभय टिळक

■ त. भा. प्रतिनिधी

कोल्हापूर : महाराष्ट्राचे अर्थकारण कुंठित शेती आणि असंतुलित नागरीकरण अशा दुहेरी कोंडीत सापडले आहे. यावर मात करण्यासाठी विकेंद्रित औद्योगीकरण हाच एकमेव प्रभावी उपाय आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ व विचारवंत डॉ. अभय टिळक यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील कॉ. दत्ता देशमुख अध्यासनाच्या वतीने आयोजित 'प्रभाकरपंत कोरगावकर व्याख्यानमालेत ते बोलत होते. 'महाराष्ट्राचे अर्थकारण : प्रवाह आणि आव्हाने" या विषयावर त्यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कोरगावकर ट्रस्टच्या विश्वस्त पल्लवी कोरगावकर होत्या.

डॉ. टिळक म्हणाले, महाराष्ट्राचा भूगोल वैशिष्ट्यपूर्ण असून येथील शेतीचे अर्थकारण प्रामुख्याने पावसावर अवलंबून आहे. अर्थकारणात बदल होत असताना त्याची सुरुवात आणि शेवट शेतीतूनच होतो. कृषी आणि औद्योगिक क्षेत्राचा संतुलित विकास साधण्याची दृष्टी महाराष्ट्रात १९६० पासून दिसून येते. तथापि, महाराष्ट्राच्या अर्थकारणातील चढउतारांमुळे जटिल समस्या निर्माण झाल्या असून सहकार क्षेत्राची स्थितीही फारशी समाधानकारक नाही. अशा स्थितीत विकेंद्रित औद्योगीकरणाचा पर्याय स्वीकारण्याची आवश्यकता आहे.

पल्लवी कोरगावकर म्हणाल्या, दातृत्वाची भाषा वेगळी असून ती समजून घेतली पाहिजे. आपण ज्या समाजात राहतो, त्याचे आपण देणे लागतो; त्यामुळे समाजाप्रती आपले उत्तरदायित्व काय आहे, याचा विचार करून प्रत्यक्षात कृती करायला हवी. डॉ. नेहा वाडेकर यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. दत्तात्रय सावंत यांनी सूत्रसंचालन केले, तर अध्यासनाचे समन्वयक डॉ. प्रकाश पवार यांनी आभार मानले. यावेळी भरत शास्त्री, तन्मय कोरगावकर यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर, अभ्यासक, नागरिक आणि विद्यार्थी–विद्यार्थिनी उपस्थित होते.



कोल्हापूर : व्याख्यानात बोलताना ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. अभय टिळक सोबत पल्लवी कोरगांवकर व तन्मय कोरगांवकर.

10 OCT 2026
सकाळ

'सामाजिक समतेतूनच राष्ट्रनिर्मितीची प्रक्रिया पूर्ण'

विद्यापीठात सामाजिक समावेशन केंद्रात व्याख्यान



ज्ञानेश्वर बंडगर महाराज

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ९ : 'महाराष्ट्रातील भक्ती आणि वारकरी परंपरेने सामाजिक समतेचा विचार सातत्याने मांडला आहे. देशातील नागरिकांमध्ये परस्परांप्रती बंधुभाव, समानतेची भावना, एकत्व निर्माण झाले तरच राष्ट्रनिर्मितीची प्रक्रिया पूर्ण होईल,' असे प्रतिपादन ज्ञानेश्वर बंडगर महाराज यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या सामाजिक समावेशन अभ्यास केंद्राने घेतलेल्या कासुबाई यलबाजी ममता तुकाराम मंगल स्मृती व्याख्यानमालेत 'सामाजिक समता व राष्ट्रीय एकता' या विषयावर ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव होत्या.

बंडगर महाराज म्हणाले, 'छत्रपती शिवाजी महाराज, राजर्षी शाहू महाराज, महात्मा जोतिराव फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांमध्ये सामाजिक समता आणि राष्ट्रीय एकात्मतेचा मूलभूत आशय आहे.

सामाजिक समतेतूनच राष्ट्रीय एकात्मतेचा पाया भक्कम होतो. समाजातील जातिभेद आणि स्त्री-पुरुष विषमता दूर केल्याशिवाय खऱ्या अर्थाने राष्ट्रीय एकता, एकात्मता निर्माण होऊ शकत नाही. त्यामुळे या विषमतेचे उच्चाटन करणे आवश्यक आहे. डॉ. जाधव म्हणाल्या, 'सामाजिक समावेशन केंद्राच्या माध्यमातून विद्यापीठ समाजातील विविध घटकांना जोडून घेण्याबरोबरच त्यांना मुख्य प्रवाहात ओळख प्रदान करण्यासाठी प्रयत्नशील आहे.'

अभ्यास केंद्राचे संचालक डॉ. मुरलीधर भानारकर यांनी स्वागत केले. यावेळी डॉ. चेतना सोनकांबळे, किरण पवार, विद्यानंद खंडागळे, किशोर खिलारे, उदय पोवार, युवराज कदम, रामचंद्र पवार, राजेश मेश्राम, दिनेश उथळे, अनमोल कोठाडिया, यश आंबोळे, विश्वजित गुरव, शरद पाटील, माउली पांढरे, दत्ता घुटुकडे उपस्थित होते.

10 OCT 2026
तरुण भारत



कोल्हापूर : कार्यशाळेत आपत्ती व्यवस्थापनाची प्रात्यक्षिक दाखविण्यात आली.

महावीर महाविद्यालयात आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळा

प्रतिनिधी,कोल्हापूर

महावीर महाविद्यालय व जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण यांच्या संयुक्त विद्यमाने 'आपत्ती व्यवस्थापन" कार्यशाळा झाली. कार्यशाळेचे उद्घाटन जिल्हा आपत्ती व्यवस्थापनचे प्रमुख डॉ. प्रसाद संकपाळ यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. गोमटेश्वर पाटील होते.

कार्यशाळेत जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने स्थापन केलेल्या तृतीयपंथींच्या आपत्ती व्यवस्थापन पथकाने सहभाग घेतला. या पथकातील सदस्य शिवानी गजबर यांनी विद्यार्थ्यांना आपत्ती व्यवस्थापनाबद्दल मार्गदर्शन केले. प्रमुख प्रशिक्षक कृष्णात सोरटे, शुभम काटकर, प्रथमेश एरुडकर व साहिल कोळी यांनी प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन केले. यामध्ये विद्यार्थ्यांनीही प्रात्यक्षिकांसह आपत्ती व्यवस्थापनाचा प्रत्यक्ष अनुभव घेतला.

कार्यशाळेसाठी भूगोल विभाग, समाजशास्त्र विभाग एनसीसी, एनएसएस विभागातील ११५ विद्यार्थी उपस्थित होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अद्वैत जोशी यांनी मार्गदर्शन केले. डॉ. शशिकांत पाटील, डॉ अंकुश गोंडगे, कॅप्टन डॉ. उमेश वांगदरे, प्रा. प्रकाश चव्हाण यांनी कार्यशाळेचे आयोजन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 OCT 2026

सकाळ

टेंबे यांचे संगीत समीक्षा क्षेत्रात मोलाचे योगदान : कुंटे

कोल्हापूर, ता. ९ : 'ज्येष्ठ संगीतकार गोविंदराव टेंबे यांनी संगीत क्षेत्राबरोबरच साहित्य, संगीत समीक्षेतही मोलाचे योगदान दिले. त्यांच्या लेखनातून संगीतकलेचे सूक्ष्म आकलन, नाट्यप्रयोगांची जाण, तत्कालीन सांस्कृतिक जीवनाचे प्रत्ययकारी चित्रण दिसून येते,' असे प्रतिपादन पुणे येथील संगीतशास्त्राचे अभ्यासक केशवचैतन्य कुंटे यांनी आज व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागात ज्येष्ठ संगीतकार व रंगकर्मी गोविंदराव टेंबे यांच्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित व्याख्यानात कुंटे बोलत होते. ज्येष्ठ शास्त्रीय गायक संगीताचार्य सुधीर पोटे उपस्थित होते.



केशवचैतन्य कुंटे

टेंबे यांच्या लेखनातील रसास्वादक समीक्षा हा विशेष उल्लेखनीय पैलू आहे. त्यांच्या लेखनात कलाकृतीचा आस्वाद घेताना तिचे तांत्रिक आणि भावनिक पैलू उलगडण्याची क्षमता दिसून येते. टेंबे यांच्या साहित्याचा आवाका लक्षात घेता, त्यांच्या विविध लेखनप्रकारांचा स्वतंत्रपणे अभ्यास होणे आवश्यक असल्याचे कुंटे यांनी सांगितले.

मराठीतील पहिला बोलपट 'अयोध्येचा राजा' यामध्ये वयाच्या ५० व्या वर्षी नायकाची भूमिका साकारण्याचा मान टेंबे यांना मिळाला. नाटकातील प्रसंग, गाण्याची वेळ आणि गायकाच्या आवाजाचा विचार करून संगीत रचण्याची त्यांची पद्धत वैशिष्ट्यपूर्ण होती. त्यांची नाट्यकलेविषयीची भूमिका आजही मार्गदर्शक असल्याचे पोटे यांनी सांगितले.

मराठी अधिविभागाचे प्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी मनोगत व्यक्त केले. संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. विनोद ठाकूर-देसाई यांनी स्वागत केले. गुणीदास फाउंडेशनचे राजप्रसाद धर्माधिकारी, डॉ. भाग्यश्री मुळ्ये, मिलिंद गुणे उपस्थित होते. विशाखा जोशी यांनी सूत्रसंचालन केले. श्रुती खोचीकर यांनी आभार मानले.

10 OCT 2026
सकाळ

महाराष्ट्राच्या आर्थिक प्रगतीसाठी विकेंद्रित औद्योगीकरण प्रभावी

डॉ. टिळक : विद्यापीठात कोरगावकर व्याख्यान



डॉ. अभय टिळक

कोल्हापूर, ता. ९ : 'महाराष्ट्राचे अर्थकारण कुंठित शेती आणि असंतुलित नागरीकरण अशा दुहेरी कोंडीत सापडले आहे. यावर मात करण्यासाठी विकेंद्रित औद्योगीकरण हाच एकमेव प्रभावी उपाय आहे,' असे प्रतिपादन ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. अभय टिळक यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील कॉ. दत्ता देशमुख अध्यासनाच्या प्रभाकरपंत कोरगावकर व्याख्यानमालेत ते आज 'महाराष्ट्राचे अर्थकारण : प्रवाह आणि आव्हाने' या विषयावर बोलत होते. अध्यक्षस्थानी कोरगावकर ट्रस्टच्या विश्वस्त पल्लवी कोरगावकर होत्या.

डॉ. टिळक म्हणाले, 'कृषी आणि औद्योगिक क्षेत्राचा संतुलित विकास साधण्याची दृष्टी महाराष्ट्रात १९६० पासून दिसून येते. तथापि, महाराष्ट्राच्या अर्थकारणातील चढउतारांमुळे जटिल समस्या निर्माण झाल्या असून, सहकार क्षेत्राची स्थितीही फारशी समाधानकारक नाही. अशा स्थितीत विकेंद्रित औद्योगीकरणाचा पर्याय स्वीकारण्याची आवश्यकता आहे. ज्यामुळे विकासाच्या केंद्रांची व्याप्ती ग्रामीण, निमशहरी प्रदेशांपर्यंत वाढेल आणि अधिक समावेश विकास साधण्याची शक्यता निर्माण होईल.'

पल्लवी कोरगावकर म्हणाल्या, 'दातृत्वाची भाषा वेगळी असून, ती समजून घेतली पाहिजे. आपण ज्या समाजात राहतो, त्याचे आपण देणे लागतो; त्यामुळे समाजाप्रती आपले उत्तरदायित्व काय आहे, याचा विचार करून प्रत्यक्षात कृती करायला हवी.'

डॉ. नेहा वाडेकर यांनी स्वागत केले. डॉ. दत्तात्रय सावंत यांनी सूत्रसंचालन केले. भरत शास्त्री, तन्मय कोरगावकर उपस्थित होते. डॉ. प्रकाश पवार यांनी आभार मानले.

10 OCT 2026
पुण्यनगरी

जागतिक आघाडीच्या दोन टक्के संशोधकांत डॉ. संजय लठ्ठे

कोल्हापूर : अमेरिकेतील स्टॅनफोर्ड विद्यापीठाने जाहीर केलेल्या जगातील आघाडीच्या दोन टक्के संशोधकांच्या यादीत विवेकानंद कॉलेजच्या भौतिकशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. संजय लठ्ठे यांचा सलग सातव्या वर्षी समावेश झाला आहे. त्यांना २०२६ मध्ये पुन्हा मानांकन मिळाले आहे. स्टॅनफोर्ड विद्यापीठाने संशोधकांच्या सार्वकालिक कारकिर्दीवर आधारित आणि वार्षिक कामगिरीवर आधारित अशा दोन स्वतंत्र याद्या जाहीर केल्या आहेत. या दोन्ही याद्यांमध्ये डॉ. लठ्ठे यांनी स्थान मिळवले आहे. 'स्कोपस' डेटाबेसच्या आधारे तयार केलेल्या या क्रमवारीसाठी १९६० ते २०२५ या कालावधीतील संशोधन योगदानाचा विचार करण्यात आला आहे. डॉ. लठ्ठे यांच्या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे, प्रभारी प्राचार्य डॉ. सी. बी. पाटील, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे डॉ. भाऊराव दांगट, संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे आणि प्रबंधक सचिन धनवडे यांनी त्यांचे अभिनंदन केले.

10 OCT 2026

तरुण भारत

'वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांना बॅंकिंग क्षेत्रात उत्तम संधी'

कोल्हापूर : दिवसेंदिवस बॅंकिंग क्षेत्राचे जाळे विस्तारत असून बॅंकांच्या शाखा मोठ्या प्रमाणात निर्माण होत आहे त्यामुळे वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांना बॅंकिंग क्षेत्रात उत्तम संधी आहे असे प्रतिपादन राजे विक्रमसिंह घाटगे को–ऑपरेटिव्ह बॅंकेच्या शाखाधिकारी सौ. मानसी शिंदे यांनी केले. त्या देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स मधील अर्थशास्त्र विभाग आणि बॅंकिंग सर्टिफिकेट कोर्स अंतर्गत बॅंक स्टडी व्हिजिट प्रसंगी बोलत होत्या. यावेळी प्रमुख उपस्थिती महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. आर. एस. नाईक यांची होती. त्या पुढे म्हणाल्या , देशातील लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत आहे आणि जन्माला येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला बॅंकेची गरज आहे डिजिटल बॅंकिंग, यूपीआय, आरटीजीएस, एनईएफटी, कॅशलेस व्यवहार, मोबाईल बॅंकिंग यामुळे बॅंकिंग व्यवहार मोठ्या प्रमाणात वाढत आहे त्यामुळे बॅंकिंग क्षेत्रात वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांना चांगले भवितव्य आहे. यावेळी विद्यार्थ्यांनी बॅंकेचे कामकाज प्रत्यक्ष कसे चालते त्याचा अनुभव घेतला. उपप्राचार्य डॉ. आर. एस. नाईक यांनी महाविद्यालयाला बॅंक स्टडी व्हिजिटची परवानगी दिल्याबद्दल बॅंकेच्या व्यवस्थापनाचे आभार मानले. या कार्यक्रमाला कौन्सिल ऑफ एज्युकेशनच्या अध्यक्षा सौ. रजनीताई मगदूम, उपाध्यक्ष डॉ प्रसाद मगदूम, सचिव डॉ. विश्वनाथ मगदूम, सदस्य ॲड वैभव पेडणेकर, ॲड अमित बाडकर, महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. वर्षा मैंदर्गी यांचे मार्गदर्शन लाभले. याप्रसंगी डॉ.एस. एफ. बोथीकर, प्रा. कुबेर दिंडे, डॉ.वैशाली जगताप, प्रा. संग्राम पाटील आणि विद्यार्थी उपस्थित होते.